## फौ.किर. अर्ज क्र.१/२०२२ मधील निशाणी क्र.३ वरील आदेश

अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० प्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांचेकडून अर्जदार क्र.१ यांना दरमहा रु.१५,०००/– व अर्जदार क्र.२ यास दरमहा रु.१०,०००/– अंतरिम पोटगी व प्रस्तुत अर्जाचे खर्चापोटी रु.२०,०००/– असा अंतरिम अनुतोष मंजूर होणेसाठी प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

### अर्जदारांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

०२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत शारिरीक संबंध प्रस्थापित केले. त्या दरम्यान अर्जदार क्र.१ ही गरोदर राहिली. त्याबाबतची सर्व हकीकत तिने तिच्या आईवडीलांना सांगितली. त्यानंतर तिचे आई–वडीलांनी पलानगांव येथील प्रतिष्ठीत व्यक्तींची सभा बोलावली. त्या सभेमध्ये गैरअर्जदार क्र.१ यास देखील बोलावण्यात आले. त्याने अर्जदार क्र.१ हिच्या गर्भातील बाळ त्याचे असल्याचे कबूल केले व तो अर्जदार क्र.१ हिला त्याचे गावी पिंडकेपार येथे नेण्यास तयार झाला व पिंडकेपार येथे नेले. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ सोबत त्याच्या परिवारात नांदू लागली. तथापि, गैरअर्जदारांनी तिला एकही दिवस चांगले वागविले नाही व तुझ्या पोटातील गर्भ आमचा नाही, तु दुस–या मुलासोबत झोपलीस आणि त्याचा गर्भ आपल्या पोटात वाढवित आहेस, असे म्हणून शिवीगाळ करीत होते. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदार क्र.१ हिला म्हणत होती की, तू माझ्या मुलाला फसविले आहेस, तू त्याला सोडून माहेरी जा, नाहीतर

तुला माझा मुलगा जीवंत मारुन टाकेन, अशी धमकी देवून तिला शिवीगाळ करीत असे. त्यानंतर अंदाजे १५ ते २० दिवस अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांसोबत राहिली. त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ हा तिचेसोबत लग्न करण्यास नकार देत होता. त्यानंतर गैरअर्जदारांचे अर्जदार क्र.१ हिस त्रास देणे वाढतच गेले. त्यामुळे अर्जदार क्र.१ हिने घडलेली सर्व हकीकत तिच्या आईवडीलांना सांगितली. तेव्हा अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी त्यांच्या गावचे पाच पंच घेवून मौजा पिंडकेपार येथे तंटामुक्ती समितीची मिटींग बोलाविली आणि त्या मिटींगमध्ये अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र.१ यांना बोलाविले होते. तंटामुक्ती समितीच्या पदाधिका–यांनी गैरअर्जदार यांना समजावले पण गैरअर्जदार क्र. १ हा समजून घेण्यास तयार नव्हता आणि म्हणत होता की, तो अर्जदार क्र.१ हिला त्याचेसोबत ठेवणार नाही व तिच्यासोबत लग्न करणार नाही कारण तिच्या पोटातील गर्भ त्याचा नाही. त्यानंतर अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी पोलीस ठाणे, चिचगड येथे गैरअर्जदार क्र. १ विरुध्द फिर्याद दिली. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ यास पोलीस स्टेशन येथे बोलावले व समजूत दिली. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ सोबत लग्न करण्यास तयार झाला व त्यानंतर दिनांक ०२/१०/२०२० रोजी धुकेश्वरी मंदिर, देवरी येथे त्यांचे जातीरिवाजाप्रमाणे लग्न झाले.

०३. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ च्या विनंतीवरुन अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ चे माहेरी राहू लागले. दोघेही वैवाहिक जीवन नांदत असतांना गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र.१ ची कोणतीही काळजी घेत नव्हता व लहान सहान कारणांवरुन भांडण करीत असे. अशातच अर्जदार क्र.

१ हिला दिनांक ६/११/२०२० रोजी गैरअर्जदार क्र.१ पासुन मुलगा जन्मास आला. मुलगा झाल्यानंतर सुध्दा गैरअर्जदार क्र. १ च्या वागणुकीत काहीही फरक पडला नाही. तो नेहमी तिच्यासोबत भांडण करुन मारण्या–पिटण्याची धमकी देत असे. तसेच तो अर्जदारांच्या कोणत्याही गरजा पूर्ण करीत नव्हता. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हे लग्नानंतर अंदाजे चार महिने अर्जदार क्र.१ च्या माहेरी राहिले.

०४. मे, २०२० मध्ये एक दिवस गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिला घरगुती कारणांवरुन भांडण करुन शिवीगाळ केली व तिला सोडून त्याचे गांवी पिंडकेपार येथे निघून गेला. त्यावेळी अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी अर्जदार क्र. १ व २ यांना सुध्दा पिंडकेपार येथे गैरअर्जदारांच्या घरी सोडले. त्यावेळी गैरअर्जदारांनी त्यांना घरात प्रवेश दिला नाही. तेव्हा गैरअर्जदार क्र.२ ने अर्जदार क्र.१ हिला जर तू आमच्या घरात प्रवेश केलास तर तुला येथेच जिवंत गाडून टाकीन, तरी तु व तुझे मायबाप काहीच करु शकणार नाहीत, असे म्हणून शिवीगाळ केली. गैरअर्जदार क्र.१ हा सुध्दा तिला म्हणत होता की, तुझे आमच्या घरात कांहीही काम नाही, तू आल्या पावली तुझ्या माहेरी निघून जा नाहीतर तुला मारुन टाकेन अशी धमकी दिली. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही मुलासोबत परत तिच्या माहेरी आली व तेथेच राहू लागली. तेव्हापासुन म्हणजेच मे, २०२० पासून अर्जदार क्र.१ ही तिच्या मुलासोबत माहेरी रहात आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ व २ यांना त्यांच्याकडे घेवुन जावे म्हणून वारंवार विनंती केली, माहिती पाठविली परंतु गैरअर्जदार क्र.१ हा त्यांना भेटायला अगर नांदण्यास घेऊन जाण्यासाठी आला नाही.

०५. अर्जदार क्र.१ चे वडील गरीब असल्यामुळे ते अर्जदार व तिच्या मुलाचे पालनपोषण करु शकत नाहीत म्हणून अर्जदार क्र.१ हिला तिच्या व तिच्या मुलाच्या पालनपोषणाकरीता, निवासाकरीता व इतर खर्चाकरीता सदर अर्ज न्यायालयात दाखल करावा लागला आहे. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची लग्नाची बायको असून अर्जदार क्र.२ हा गैरअर्जदार क्र.१ पासुन झालेला मुलगा आहे. त्यामुळे त्यांचा निर्वाह गैरअर्जदार क्र. १ ने करणे हे त्याचे कर्तव्य आहे परंतु तो अर्जदार क्र.१ व २ यांचे पालनपोषण करण्यास टाळाटाळ करीत आहे.

०६. गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्या मालकीची मौजा पिंडकेपार येथे ओलीताची दुबार फसलीची ६ एकर शेती असून त्यापासून ते वर्षाला दहा लक्ष रुपये कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा शेती व्यवसायाव्यतिरिक्त मजुरीचे काम करतो व दरमहा रुपये २० ते ३० हजार कमवितो. सदर कमाईतून गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ व २ यांचे पालनपोषण सहज करु शकतो. मूळ अर्ज निकाली होण्यास बराच कालावधी लागणार असल्यामुळे दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यांना पोलनपोषणाकरीता पोटगी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ यांना दरमहा रु.१५,०००/- व अर्जदार क्र.२ यास दरमहा रु.१०,०००/- अशी अंतरिम पोटगी व प्रस्तुत अर्जाचे खर्चापोटी रक्कम रु.२०,०००/- वेगळे देण्याबाबत आदेश व्हावा अशी विनंती अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जान्वये केली आहे.

०७. गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.९ वर दाखल करुन अर्जदारांची सर्व कथने नाकारली आहेत. गैरअर्जदार यांनी विशेषतः असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ व अर्जदार क्र.१ यांचा गैरकायदेशीर विवाह दिनांक ०२/१०/२०२० रोजी मौजा देवरी येथे मॉ धुकेश्वरी मंदिरात बळजबरीने लावण्यात आलेला आहे. सदर लग्नाच्या वेळी अर्जदार क्र.१ व तिच्या घरच्या लोकांनी गैरअर्जदार क्र.१ यास मारण्या–पिटण्याची व खोटया प्रकरणात फसविण्याची धमकी देवून लग्न लावण्यात आले आहे. त्यामुळे सदरचा गैरकायदेशीर विवाह गैरअर्जदारांना मुळीच मान्य नाही.

०८. गैरअर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. १ यांची मोबाईल फोनवर चुकीचा नंबर लागल्यामुळे सन २०२० च्या जानेवारी महिन्यात ओळख झाली व त्यानंतर अर्जदार क्र. १ ही वारंवार मोबाईलद्वारे गैरअर्जदार क्र. १ सोबत संपर्क करु लागली. दोघेही एकाच समाजाचे असल्यामुळे अर्जदार क्र.१ हिने होळी सणाच्या वेळी गैरअर्जदार क्र.१ यास आपल्या घरी बोलाविले. त्यावेळी गैरअर्जदार क्र. १ हा तिच्या घरी गेला होता व तिच्या कुटूंबासोबत भेट घेतल्यानंतर त्याच दिवशी आपल्या गावी परत गेला. त्यानंतर अर्जदार क्र.१ व तिच्या घरच्या लोकांना गैरअर्जदार क्र.१ चा स्वभाव पसंत असल्यामुळे त्यांनी त्याच्यासोबत मोबाईलद्वारे संपर्क वाढविला. त्यावेळी अर्जदार क्र.१ व तिच्या घरच्या लोकांच्या मनात काय प्रकार सुरु आहे, याची काही एक कल्पना गैरअर्जदाराला नव्हती.

०९. दिनांक २०/०९/२०२० रोजी अर्जदार क्र.१ हिच्या कुटूंबातील व्यक्तींनी गैरअर्जदार क्र.१ याला फोन करुन तिच्या गावी मौजा

पलानगांवला येण्याविषयी कळविले. त्यानुसार दिनांक २१/९/२०२० रोजी गैरअर्जदार क्र.१ हा त्यांच्या घरी पोहोचला. तेथे गेल्यावर अर्जदार क्र.१ व तिच्या घरच्या लोकांनी आग्रह करुन गैरअर्जदार क्र.१ यास रात्रभर मुक्काम करावा म्हणून विनवणी केली व त्यांनी गैरअर्जदार क्र.१ याला अर्जदार क्र.१ सोबत विवाह करावा म्हणून दबाव टाकणे सुरु केले. त्यावेळी त्यांनी अर्जदार क्र.१ ही तुझ्यापासुन गर्भवती आहे, असा खोटा आरोप त्याच्यावर लावला तसेच त्यांनी गैरअर्जदार क्र.१ याचे विरुध्द् खोटी तक्रार पोलीस ठाण्यात करुन आम्ही तुला फसवू अशीही धमकी त्याला दिली. दुस–या दिवशी अर्जदाराच्या घरच्या लोकांनी आपसामध्ये संगनमत करुन समाजाची मिटींग भरविली व त्यामध्ये गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला त्याच्यासोबत मौजा पिंडकेपार येथे न्यावे अशी जबरदस्ती केली. त्यावेळी गावातील लोकांचा जोडजमाव पाहून गैरअर्जदार क्र.१ हा घाबरुन गेला व त्याने तिला आपल्यासोबत नेण्यास होकार दिला.

१०. गैरअर्जदार क्र.१ ने त्याच दिवशी तिला आपल्यासोबत पिंडकेपारला आणल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याच्या कुटूंबियांना अतिशय आश्चर्य वाटले व त्यांनी त्याबाबत त्याला विचारपूस केली असता त्याने घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. गैरअर्जदार क्र.१ च्या वडीलांनी अर्जदार क्र.१ ला विश्वासात घेवून तिला झालेली गर्भधारणा कुणाकडून झाली, असे विचारले असता तिने सदरची गर्भधारणा ओमप्रकाश राऊत राहणार धानोरी याचेकडून झाली असे स्पष्ट सांगितले. सदर प्रकरणाचा न्यायनिवाडा होण्याकरीता सदरचे प्रकरण गावातील तंटामुक्ती समितीकडे सोपविण्यात आले

व मिटींग होईपर्यंत दोघांनाही वेगवेगळे ठेवण्यात आले. दि.३०/०९/२०२० रोजी पिंडकेपारला तंटामुक्ती समितीची मिटींग भरविण्यात आली व त्या मिटींगमध्ये अर्जदार क्र.१ चे आईवडीलांना बोलाविण्यात आले होते. त्यावेळी तंटामुक्ती समितीच्या सदस्यांनी सुध्दा गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.१ यांना गर्भधारणेबाबत विचारले असता तिने तिचा गैरअर्जदार क्र.१ सोबत कधीही शारिरीक संबंध झाला नाही असे स्पष्टपणे सांगितले. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ ने सुध्दा त्याचे अर्जदार क्र.१ सोबत कधीही शारिरीक संबंध झाला नसल्याचे कबूल केले. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून झाल्यानंतर तंटामुक्त समितीच्या सदस्यांनी अर्जदार क्र.१ हिला तिच्या आईवडीलांसोबत घरी परत जाण्याचा सल्ला दिला.

**११.** त्यानंतर अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांनी आपसांत संगनमत करुन गैरअर्जदार क्र.१ वर दबाव आणण्यासाठी त्याचे विरुध्द् खोटी व बनावट तक्रार पोलीस ठाणे, चिचगड येथे दिली. त्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०२.१०.२०२० रोजी गैरअर्जदार क्र.१ व त्याचे वडिलांना पोलीस ठाण्यामध्ये बोलाविण्यात आले. त्यावेळी पोलीस ठाण्याचे अधिका–यांनी गैरअर्जदार क्र.१ यास दमदाटी करुन अर्जदार क्र.१ सोबत लग्न करावे अन्यथा गुन्हा दाखल करावा लागेल अशी धमकी दिली. त्यानंतर त्याच दिवशी अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांनी गैरअर्जदार क्र.१ यास मौजा देवरी येथील मॉ धुकेश्वरी मंदिरात आणले व त्याचेवर जबरदस्ती करुन, त्याचे इच्छेविरुध्द् गैरकायदेशीरपणे अर्जदार क्र.१ सोबत लग्न लावून दिले. त्यानंतर त्यांनी गैरअर्जदार क्र.१ वर मानसिक दडपण आणून त्याला पलानगाव येथ घेऊन

गेले. सदर घडलेल्या प्रकारामुळे गैरअर्जदार क्र.१ हा फार घाबरुन गेला होता. पोलीसांनी व अर्जदार क्र.१ यांचे घरच्या लोकांनी दिलेल्या धमकीमुळे त्याने होणार प्रकार निमूटपणे सहन केला.

१२. गैरअर्जदार क्र.१ यास अर्जदार क्र.१ च्या घरी आणल्यानंतर तिचे आई–वडिलांनी त्याला शारीरिक व मानसिक त्रास देणे सुरु केले. ते वारंवार त्याचा अपमान करुन त्याला अश्लील शब्दात शिवीगाळ करीत असत. त्याचप्रकारे अर्जदार क्र.१ ही सुध्दा गैरअर्जदार क्र.१ हिला अतिशय त्रास दयायची व वेळोवेळी पोलीसांची धमकी देत होती. जवळपास १ महिन्यापर्यंत तो अर्जदार क्र.१ च्या घरी राहिला. तथापि, त्या कालावधीमध्ये त्यांचा पती–पत्नी म्हणून कधीच संबंध आला नाही. अर्जदार क्र.१ चे वडील गैरअर्जदार क्र.१ याचेकडून एखादया मजूराप्रमाणे काम करुन घेत होते. याच कालावधीत अर्जदार क्र.१ ची प्रसुती झाली. अर्जदार क्र.१ व तिच्या घरच्या लोकांचा त्रास अतिशय वाढल्यामुळे तसेच झालेला विवाह बेकायदेशीर असल्यामुळे त्याने दिवाळी सणाचा बहाणा करुन दि.१४.११.२०२० रोजी आपल्या गावी मौजा पिंडकेपार येथे परत आला व तेव्हापासून तो आपल्या वडिलांच्या आश्रयाने पिंडकेपार येथे रहात आहे.

१३. गैरअर्जदार क्र.१ हा अतिशय साधा भोळा असल्यामुळे त्याच्या स्वभावाचा गैरफायदा घेवून अर्जदार क्र.१ व तिच्या घरातील लोकांनी गैरअर्जदार क्र.१ वर मानसिक दडपण आणून त्याला खोटया प्रकरणात फसवण्याची धमकी देऊन बेकायदेशीरपणे व बळजबरीने अर्जदार क्र.१ सोबत विवाह लावून दिलेला आहे जो रद्दबातल ठरविण्याकरीता गैरअर्जदार क्र.१ याने

दिवाणी न्यायालय, व.स्तर, गोंदिया यांचे न्यायालयात एच.एम.पी.क्र.१५६/२०२० हा अर्ज दाखल केला असून तो प्रलंबित आहे. वास्तविक, गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.१ यांचा पती–पत्नी म्हणून कोणताही संबंध नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती गैरअर्जदार क्र.१ याने केली आहे.

**१४.** दोन्ही पक्षकारांच्या कथनांवरुन तसेच संचकेतील कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन करता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूंचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ व २ हे गैरअर्जदार क्र. १ यांचेकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत काय? असल्यास किती ? | अंशतः होय. अर्जदार क्र.१–दरमहा रुपये २,०००/– व अर्जदार क्र.२– दरमहा रु.१०००/– |
| २. | आदेश काय ? | अर्ज अशंतः मंजूर |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>प्रश्नबिंदू क्र. १ व २ करीता</u> –

**१५.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार क्र.१ यांनी आपल्या अंतरिम पोटगी अर्जाचे कथनापुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. अर्जदार क्र.१ यांचे शपथेवरील कथन व युक्तिवादाप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत शारिरीक संबंध प्रस्थापित

केले. त्या दरम्यान अर्जदार क्र.१ ही गरोदर राहिली. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिच्या गर्भातील बाळ त्याचे असल्याचे कबूल केले व तिला पिंडकेपार येथे नेले. तथापि, गैरअर्जदारांनी तिला एकही दिवस चांगले वागविले नाही व तुझ्या पोटातील गर्भ आमचा नाही, तु दुस–या मुलासोबत झोपलीस आणि त्याचा गर्भ आपल्या पोटात वाढवित आहेस, असे म्हणून शिवीगाळ करीत होते. पंचांसमक्ष देखील गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला त्याचेसोबत ठेवणार नाही व तिच्यासोबत लग्न करणार नाही कारण तिच्या पोटातील गर्भ त्याचा नाही असे सांगितले. त्यानंतर अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी पोलीस ठाणे, चिचगड येथे गैरअर्जदार क्र. १ विरुध्द फिर्याद दिली. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ यास पोलीस स्टेशन येथे बोलावले व समजूत दिली. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ सोबत लग्न करण्यास तयार झाला व त्यानंतर दिनांक ०२/१०/२०२० रोजी धुकेश्वरी मंदिर, देवरी येथे त्यांचे जातीरिवाजाप्रमाणे लग्न झाले.

**१६.** त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ च्या विनंतीवरुन अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ चे माहेरी राहू लागले. दोघेही वैवाहिक जीवन नांदत असतांना गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र.१ ची कोणतीही काळजी घेत नव्हता व लहान सहान कारणांवरुन भांडण करीत असे. अशातच अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार क्र.१ पासुन मुलगा जन्मास आला. त्यानंतर देखील गैरअर्जदार क्र.१ याचे वागणूकीत फरक पडला नाही व तो नेहमी तिच्यासोबत भांडण करुन मारण्या–पिटण्याची धमकी देत असे. तसेच तो अर्जदारांच्या

कोणत्याही गरजा पूर्ण करीत नव्हता. मे, २०२० मध्ये एक दिवस गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिला घरगुती कारणांवरुन भांडण करुन शिवीगाळ केली व तिला सोडून त्याचे गांवी पिंडकेपार येथे निघून गेला. त्यानंतर अर्जदार क्र.१ च्या वडीलांनी अर्जदार क्र. १ व २ यांना सुध्दा पिंडकेपार येथे गैरअर्जदारांच्या घरी सोडले परंतु गैरअर्जदारांनी त्यांना घरात प्रवेश दिला नाही व शिवीगाळ करुन धमकी दिली. सबब, मे, २०२० पासून अर्जदार क्र.१ ही मुलासह माहेरीच रहात आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ व २ यांना त्यांच्याकडे घेवुन जावे म्हणून वारंवार विनंती केली, माहिती पाठविली परंतु गैरअर्जदार क्र.१ हा त्यांना भेटायला अगर नांदण्यास घेऊन जाण्यासाठी आला नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ व २ यांचे पालनपोषण करण्यास टाळाटाळ करीत आहे. मूळ अर्ज निकाली होण्यास बराच कालावधी लागणार असल्यामुळे दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यांना पोलनपोषणाकरीता पोटगी मिळावी अशी विनंती अर्जदारांनी केली आहे.

**१७.** याउलट गैरअर्जदार क्र.१ यांचे प्रतिकथन व युक्तिवादाप्रमाणे त्याचा व अर्जदार क्र.१ चा गैरकायदेशीर विवाह दिनांक ०२/१०/२०२० रोजी मौजा देवरी येथे मॉ धुकेश्वरी मंदिरात बळजबरीने लावण्यात आलेला आहे. सदर लग्नाच्या वेळी अर्जदार क्र.१ व तिच्या घरच्या लोकांनी गैरअर्जदार क्र.१ यास मारण्या–पिटण्याची व खोटया प्रकरणात फसविण्याची धमकी देवून लग्न लावण्यात आले आहे. त्यामुळे सदरचा गैरकायदेशीर विवाह गैरअर्जदारांना मुळीच मान्य नाही. वास्तविक गैरअर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. १ यांची

मोबाईल फोनवर चुकीचा नंबर लागल्यामुळे सन २०२० च्या जानेवारी महिन्यात ओळख झाली व त्यानंतर अर्जदार क्र. १ ही वारंवार मोबाईलद्वारे गैरअर्जदार क्र. १ सोबत संपर्क करु लागली.

**१८.** दिनांक २०/०९/२०२० रोजी अर्जदार क्र.१ हिच्या कुटूंबातील व्यक्तींनी गैरअर्जदार क्र.१ याला फोन करुन तिच्या गावी मौजा पलानगांवला येण्याविषयी कळविले. त्यानुसार दिनांक २१/९/२०२० रोजी गैरअर्जदार क्र.१ हा त्यांच्या घरी पोहोचला. तेथे त्यांनी अर्जदार क्र.१ सोबत विवाह करावा म्हणून त्याचेवर दबाव टाकणे सुरु केले. त्यावेळी त्यांनी अर्जदार क्र.१ ही तुझ्यापासुन गर्भवती आहे, असा खोटा आरोप त्याच्यावर लावला. तसेच त्यांनी गैरअर्जदार क्र.१ याचे विरुध्द् खोटी तक्रार पोलीस ठाण्यात करुन आम्ही तुला फसवू अशीही धमकी त्याला दिली. त्यामुळे तो तिला मौजा पिंडकेपार येथे घेऊन गेला. त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ च्या वडीलांनी अर्जदार क्र.१ ला विश्वासात घेवून तिला झालेली गर्भधारणा कुणाकडून झाली, असे विचारले असता तिने सदरची गर्भधारणा ओमप्रकाश राऊत राहणार धानोरी याचेकडून झाली असे स्पष्ट सांगितले.

**१९.** त्यानंतर अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांनी आपसांत संगनमत करुन गैरअर्जदार क्र.१ वर दबाव आणण्यासाठी त्याचे विरुध्द् खोटी व बनावट तक्रार पोलीस ठाणे, चिचगड येथे दिली. त्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०२.१०.२०२० रोजी अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांनी गैरअर्जदार क्र.१ यास मौजा देवरी येथील मॉ धुकेश्वरी मंदिरात आणले व त्याचेवर

जबरदस्ती करुन, त्याचे इच्छेविरुध्द् गैरकायदेशीरपणे अर्जदार क्र.१ सोबत लग्न लावून दिले. त्यानंतर त्यांनी गैरअर्जदार क्र.१ वर मानसिक दडपण आणून त्याला पलानगांव येथ घेऊन गेले. जवळपास १ महिन्यापर्यंत तो अर्जदार क्र.१ च्या घरी राहिला. तथापि, त्या कालावधीमध्ये त्यांचा पती–पत्नी म्हणून कधीच संबंध आला नाही. अर्जदार क्र.१ व तिच्या घरच्या लोकांचा त्रास अतिशय वाढल्यामुळे तसेच झालेला विवाह बेकायदेशीर असल्यामुळे त्याने दिवाळी सणाचा बहाणा करुन दि.१४.११.२०२० रोजी आपल्या गावी मौजा पिंडकेपार येथे परत आला. अर्जदार क्र.१ व तिच्या घरातील लोकांनी गैरअर्जदार क्र.१ वर मानसिक दडपण आणून त्याला खोटया प्रकरणात फसवण्याची धमकी देऊन बेकायदेशीरपणे व बळजबरीने अर्जदार क्र.१ सोबत विवाह लावून दिलेला आहे तो रद्दबातल ठरविण्याकरीता गैरअर्जदार क्र.१ याने दिवाणी न्यायालय, व.स्तर, गोंदिया यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला असून तो प्रलंबित आहे. वास्तविक, गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.१ यांचा पती–पत्नी म्हणून कोणताही संबंध नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

२०. दोन्ही बाजूंची कथने, प्रतिकथने व युक्तिवाद विचारात घेऊन अर्जदार यांनी नि.क्र.५ सोबत पटलावर सादर केलेली कागदपत्रे पाहता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दि.०२.१०.२०२० रोजी मॉ धुकेश्वरी मंदिर, देवरी या ठिकाणी संपन्न झालेला आहे. सदर संबंधातून अर्जदार क्र.२ रुद्र याचा जन्म झाला आहे. गैरअर्जदार क्र.१ यांचे प्रतिकथनाप्रमाणे सदरचा विवाह बेकायदेशीर असून तो

बळजबरीने झाला आहे. तसेच अर्जदार क्र.२ रुद्र हा त्यांचा मुलगा नाही. सदरचा विवाह रद्दबातल ठरविण्यासाठी त्यांनी दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, गोंदिया येथे अर्ज दाखल केला असून तो प्रलंबित आहे. सदर प्रकरणातील नि.क्र.१ ची प्रत गैरअर्जदार क्र.१ याने नि.क्र.२० सोबत दाखल केली आहे.

**२१.** उपरोक्त प्रमाणे वस्तूस्थिती विचारात घेता अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. अशा परिस्थितीत अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह अस्तित्वात असल्याचे दि.०२.१०.२०२० रोजीच्या विवाह प्रमाणपत्रावरुन प्रथमदर्शनी सिध्द् होते. इतर हरकती या प्रकरणात पुराव्यांती ठरणार आहेतच परंतु सध्या अर्जदार क्र.१ व २ यांच्या निर्वाहाचा प्रश्न निर्णयीत करणे महत्वाचे आहे. सध्या अर्जदार क्र.१ पूनम या मुलगा रुद्र म्हणजेच अर्जदार क्र. २ याचेसह माहेरी राहत आहेत अशी वस्तूस्थिती आहे. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने गैरअर्जदार क्र.१ यांनी आपले म्हणणे सादर करुन जरी अर्जदारांची कथने नाकारली असली तरी अर्जदार या माहेरी रहात असल्यापासून गैरअर्जदार क्र.१ यांनी दोन्ही अर्जदारांच्या दैनंदिन गरजा, औषधोपचार इत्यादी बाबींकरीता काय आर्थिक तरतूद केली याचा पुरावा त्यांनी अभिलेख्यावर सादर केलेला नाही. पत्नीस व मुलास सांभाळण्याची व त्यांच्या पालणपोषणाची कायदेशीर व नैतिक जबाबदारी असताना देखील गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदारांच्या दैनंदिन गरजा भागविण्याकरीता आवश्यक त्या रकमेची तरतूद केल्याचे दिसून येत नाही.

अशा परिस्थितीत गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार यांचे अन्नवस्त्राची कोणतीही सोय केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

२२. अर्जदार या सध्या त्यांचे माहेरी त्यांच्या पतीपासून अलिप्त रहात आहेत ही वस्तुस्थिती आहे. अर्जदार क्र.१ यांना गैरअर्जदार क्र.१ यांचेपासून मानसिक व शारिरीक त्रास झाला असल्यामुळेच नाईलाजास्तव त्यांना माहेरी रहावे लागत आहे अशीच परिस्थिती प्रथमदर्शनी प्रस्तुत प्रकरणात दिसून येते. अर्जदार क्र.१ या आपल्या मुलासह गैरअर्जदार क्र.१ पासून होणा–या मानसिक यातना, भावनिक क्लेश अशा त्रासांसह माहेरी रहात आहेत असे दिसून येते. त्यामुळे हा देखील कौटुंबिक हिंसाचाराचाच एक भाग आहे.

२३. अर्जदार क्र.१ यांचे कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांच्या मालकीची मौजा पिंडकेपार येथे ओलीताची दुबार फसलीची ६ एकर शेती असून त्यापासून ते वर्षाला दहा लक्ष रुपये कमवितात. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा शेती व्यवसायाव्यतिरिक्त मजुरीचे काम करतो व दरमहा रुपये २० ते ३० हजार कमवितो. यासंदर्भात अर्जदार यांनी जरी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नसला तरी गैरअर्जदार क्र.१ यांचे वय, प्रकृतीमान या बाबी विचारात घेता ते नक्कीच उत्पन्न मिळविण्यास सक्षम असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द् होते. याउलट अर्जदार क्र.१ यांना उत्पन्नाचे साधन असलेबाबत कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही. तसेच अर्जदार क्र.२ हा देखील सध्या अर्जदार क्र.१ यांचेसोबतच राहत आहे व त्याचेवर होणा–या खर्चाची बाब देखील दुर्लक्षित करता येणार नाही. सबब, गैरअर्जदार क्र.१ हे त्यांची

पत्नी व मुलाच्या प्राथमिक गरजा भागवणेस समर्थ आहेत असे प्रथमदर्शनी सिध्द् होते.

**२४.** या ठिकाणी संबंधीत कायदयामधील कलम २०(२) या तरतूदीचा विचार करता या कलमाखाली आर्थिक लाभाची रक्कम ही व्यथित व्यक्तीच्या नेहमीच्या राहणीमानाच्या दृष्टीने पुरशी, योग्य आणि वाजवी असली पाहिजे असे नमूद केलेले आहे. सबब, अर्जदार यांच्या दैनंदिन गरजा, गैरअर्जदार क्र.१ यांचे आर्थिक उत्पन्न, अवलंबित्व तसेच प्रकरणातील सर्व बाबींचा सारासार विचार करता अर्जदार क्र.१ यांना दरमहा रु. २,०००/- व अर्जदार क्र.२ यास दरमहा रु.१,०००/- अंतरिम पोटगी मंजूर करणे न्यायोचित होणार होणार आहे. तथापि, अर्जदार यांनी मागणी केलेला प्रस्तुत अर्जाच्या खर्चाची रक्कम रु.२०,०००/- मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. परिणामतः प्रश्नबिंदू क्र.१ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून प्रश्नबिंदू क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला आहे.

२. गैरअर्जदार क्र.१ संजय नरसिंघ गुघवा यांनी अर्जदार क्र.१ पूनम संजय गुघवा यांना दरमहा रक्कम रुपये २,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) व अर्जदार क्र.२ रुद्र संजय गुघवा यास दरमहा रक्कम रुपये १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) इतकी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्जाच्या अंतिम निर्धारणापर्यंत द्यावी.

३. प्रस्तुत अर्जाच्या खर्चाबाबत आदेश नाहीत.

४. प्रस्तुत आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य पुरविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vinod Vilas Khulape
Date: 2022.08.18 16:05:40 +0530

देवरी. (वि.वि.खुळपे)

दि. १२.०८.२०२२. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरी.